# प्रकरण – पहिले
# दुष्काळ आणि पाणी

# ୬ प्रकरण पहिले ଓ

## दुष्काळ आणि पाणी

### दुष्काळ आणि पाण्याचे महत्त्व :-

भारत हा कृषीप्रधान देश आहे आणि भारतीय शेतीचा विकास करावयाचा झाला तर भारतातील जलसंपत्तीचा विकास झाला पाहिजे. पाणी म्हणजे जीवदान अशी म्हण केली जाते. माणूस शेवटच्या क्षणाला सुद्धा पाणी मागत असतो यावरून पाण्याचे महत्त्व किती आहे हे कळले जाते. शेतीसाठी पाणी, पिण्यासाठी, उद्योगधंद्याना अत्यंत आवश्यक आहे. विकासासाठी पाण्याची गरज दिवसें दिवस वाढत चालली आहे.[1] पाऊसही नियमीतपणे होत नाही, पाऊस अनियमीत होत असलेने दुष्काळी परिस्थिती आणि पाणी टंचाई अनियमीत होत असलेने पश्चिम भारतात अनेक प्रदेशांना ग्रासले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील काही तालुके याच पद्धतीने ग्रासलेले आहेत. आधुनिक काळात पर्यावरणातील समतोल बिघडवणाऱ्या घटना या भागामध्ये घडताना दिसत आहेत. भारतातील आणि खास करून पश्चिम भारतातील ग्रामीण विकासाचा ज्यावेळी आपण विचार करतो, त्यावेळी या नैसर्गिक आणि मानव निर्मीत आपत्तीची दखल घ्यावी लागते.[1]

दुष्काळ म्हणजे लोकजीवन उध्वस्त करणारी भयानक परिस्थिती निर्माण होत असते. पिण्याच्या पाण्याची टंचाई, भाव वाढ, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न,हजारो लोकांचे दुसऱ्या प्रदेशात स्थलांतर, रोजगाराचा अभाव, कुपोषण आणि रोगराई यासारखे ग्रामीण जनतेपुढे प्रश्न अतिशय भेडसावतात. शेतीच्या व ग्रामीण भागाच्या विकासामध्ये एक प्रकारची कुंठित अवस्था निर्माण होत असते व त्याची झळ सर्व ग्रामीण भागाच्या जनतेला पोहचत असते. त्याचा सर्वात तडाखा भूमिहीन, शेतमजूर, गरीब व मध्यम कुटुंबांना बसत असतो. व्यापारी, साठेबाज, सावकार, आणि भ्रष्ट अधिकारी यांना दुष्काळ ही पर्वणीच वाटत असते. मोठे बागायतदार आणि सधन शेतकरी दुष्काळामुळे काहीसे काळजीत असले तरी गरीब जनतेचे जीवनच पार उध्वस्त होत आहे. आणि सरकार मात्र मागील पानावरून पुढे चालू याच पद्धतीने दुष्काळाची तीव्रता काहीशी कमी करण्यासाठी निवारणाचे उपाय हाती घेतले आहेत. दुष्काळामुळे जिथे

फारच गंभीर परिस्थिती असेल अशा गावामध्ये सरकार दुष्काळ जाहीर करते. दुष्काळी भागामध्ये शेतकऱ्यांना सारा माफ केला जातो. कर्जवसूली, वीज बिलांची वसुली यांना स्थगिती दिली जाते दुष्काळग्रस्त जनतेसाठी राज्यातून अन्नधान्य, गुरांना चारा मागवून बाजारात उपलब्ध करून दिला जातो. दुष्काळी जनतेच्या उपजीवीकेसाठी दुष्काळी कामे काढणे. काही ठिकाणी गुरांच्या छावण्या सुरू करणे असे काही प्रयत्न केले जातात. टँकरने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून दिली जाते. अशा प्रकारचे प्रयत्न सरकार करत असते.

पण जरा थांबून तटस्थपणे विचार करणाऱ्या कोणालाही हे स्पष्ट दिसेल की सरकारच्या या निवारणाच्या उपाय योजना जुजबी स्वरूपाच्या आणि मलमपट्टीसारख्या वरवरच्या वाटतात, यातून सरकार केवळ वेळ मारून नेत असते. हा खरे तर आग लागल्यानंतर विहीर खणायला सुरुवात करण्याचाच प्रकार असतो. गेली शंभर-दिडशे वर्षे महाराष्ट्रात दर दहा-पाच वर्षांनी दुष्काळाचा फेरा येतो ही नव्याने सांगण्यासारखी बाब राहिलेली नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या चाळीस वर्षात सहा पंचवार्षिक योजना आणि पाच वार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत. गेल्या चाळीस वर्षात महाराष्ट्र सरकारने दुष्काळाचा विचार करण्यासाठी पारदासानी, सुखठणकर आणि सुब्रह्मण्यम यांच्या अध्यक्षतेखाली तीन समित्या नेमल्या. त्यांचे अहवालही वेळोवेळी सरकारच्या हातामध्ये आले आहेत पण सरकारने आजवर दुष्काळाबाबत मूलभूत स्वरूपाची उपाय योजना केलेली नाही. दुष्काळ पडला की त्याची तीव्रता कमी करण्यापुरते अत्यावश्यक तेवढे उपाय सरकार योजते, त्यातूनही पुरेसे दुष्काळ निवारण होतच नाही. दुष्काळाची तीव्रता कमी होताच सरकारच्या लेखी दुष्काळ आणि दुष्काळाचा प्रश्न नाहीसा होतो! या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे असे पुन्हा दुष्काळ पडेपर्यंत सरकार मानतच नाही.

त्यामुळेच सरकारच्या आजवरच्या दुष्काळ 'निर्मुलन' योजनांमधून काहीही साध्य झालेले नाही. दुष्काळाची समस्या आहे तशी आहे. आजवरच्या प्रत्येक दुष्काळामध्ये प्रचंड दुष्काळी कामे केली गेली आहेत. रोजगार हमी योजनेखाली गेल्या आठ-दहा वर्षात एक हजार कोटी रूपयांहून अधिक रक्कम खर्च केली गेली आहे. लाखो हेक्टर जमिनीच्या बांधबंदिस्तीची, लाखो विहिरींची, हजारो पाझर तलावांची आणि छोट्या बंधाऱ्यांची, मोठ्या-मध्यम पाटबंधारे योजनाची, कोट्यावधी रोप लावण्याची कामे झाली आहेत. पण महाराष्ट्रातील दुष्काळ हटलेला नाही. ग्रामीणा विकास, दारिद्र्य निर्मूलन, शेती-प्रशिक्षण

यासाठी शेकडो योजना सरकारने राबवल्या आहेत. पण ग्रामीण भागातील बहुसंख्य जनता दुष्काळाच्या एकाच फेऱ्यात भुईसपाट होते दुष्काळाच्या दर फेऱ्यामध्ये लाखो माणसे उध्वस्त होतात. दोन-तीन रूपये मजुरीसाठी दुष्काळी कामावर ढोर मेहनत करतात. असल्या कामातून ना धड त्यांचे पोट भरते ना त्यांना नवे उत्पादक तंत्र मिळत पिढ्यान् पिढ्या असल्या कामावर यावे लागल्यामुळे ते स्वत:ची परंपरागत शेती आणि शेतीचं तंत्रेदेखील गमावून बसताहेत. एवढ्या पिढ्यांनी इतक्या खस्ता खाल्ल्यानंतर देखील केंव्हातरी बरे दिवस येतील अशी आशा वाटल्यासारखे बदलही परिस्थितीमध्ये होताना दिसत नाहीत. त्यांच्या श्रमातून त्यांना उपयुक्त होईल, त्यांना सुरक्षितता व स्थैर्य लाभले, असा सिंचन, शेती जंगल व उद्योग यांचा विकास होताना दिसत नाही. उलट हे लाखो शेतकरी दुष्काळात पूर्णपणे कंगाल होतात, शेतीवरून हाकलले जातात, काही दिवस त्यांना दुष्काळी कामांचा आधार मिळतो. नंतर ही कामे बंद होतात आणि मग त्यांचे रूपांतर भूमीहीनांमध्ये, कंगालांमध्ये आणि बेकारांच्या फौजेमध्ये होते. किंवा घरेदारे सोडून त्यांना शहराच्या झोपडपट्टीतल्या बकाल जीवनाचा आसरा घ्यावा लागतो. वर्षानुवर्षे हेच घडते आहे.

जमीन फेरवाटप, सिंचन विकास, हरित क्रांती, श्वेतक्रांती, साखर कारखाने, सहकारी संस्था, बँका, पतपुरवठा इ. बाबतीत काही बोलले गेले आहे, काही एका प्रमाणात केले गेले आहे. तरी देखील महाराष्ट्रातल्या शेतीचा विकास, काही भाग वगळता झालेला नाही. दुष्काळ हटलेला नाही. उलट त्यातून भूमिहीनांच्या संख्येत व दरिद्री जनतेत भरच पडली आहे.

**समग्र शास्त्रीय विचाराची गरज :-**

दुष्काळाबाबतचा प्रचलित दृष्टिकोन असा आहे की दुष्काळ ही जणु काही भूकंप अथवा चक्रीवादळासारखी नैसर्गिक आपत्ती आहे. आणि या आपत्तीत सापडलेल्यांना काहीतरी मदत देऊन त्यांच्या दु:खाचे तात्पुरते निवारण करणे एवढेच आपल्या हातात आहे. दुष्काळाचे संकट अगदी अंगावर येऊन कोसळले की धावपळ सुरू करायची आणि त्यातून कशीबशी सुटका करून घ्यायची. सरकारचा आजवरचा दृष्टिकोन व व्यवहार असाच राहिलेला आहे. दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती का, तर पाऊस कमी पडला की दुष्काळ पडतो आणि पाऊस कमी जास्त पडणे ही नैसर्गिक गोष्ट आहे म्हणुन सरकार, काही हीतसंबंधी मंडळी आणि त्यांच्या प्रचाराच्या प्रभावाखाली असलेले, दुष्काळांच्या कारणांविषयी पुरेशी माहिती नसलेले लोक असेच मानत असतात.

पण दुष्काळ ही नैसर्गिक आपत्ती नाही. अवर्षण हे नैसर्गिक आहे. पाऊस कमी पडणे वा अनियमित पडणे आणि त्यामुळे आवश्यक तेव्हा गरजेऐवढे पाणी उपलब्ध न होणे अवर्षण. या नैसर्गिक आपत्तीचा शेती व अर्थव्यवस्थेवरील परिणाम जेव्हा लोकांना खायला अन्न, प्यायला पाणी आणि हाताला काम न मिळण्यामध्ये होतो तेव्हा दुष्काळ पडतो. पण हे तेव्हाच घडते जेव्हा पाणीपुरवठ्याच्या, शेतीच्या आणि एकंदरच उपजीविकेच्या सामाजिक व्यवस्थेवर अवर्षण परिणाम करू शकते, व करते बहुसंख्य लोकांची उपजीवीकेची पातळी सर्वसाधारण परिणामी शेतीची स्थिती खालावताच ती पूर्णपणे कोलमडून पडते. जसे एखादा अशक्त माणूस रोगजंतूना बळी पडतो पण सुदृढ माणूस बळी पडत नाही, तसेच आधीपासून सुदृढ बनलेली शेती व ग्रामीण रचना अवर्षणाला तोंड देऊ शकते. अवर्षण या नैसर्गिक घटनेचे दुष्काळ या सामाजिक घटनेत रूपांतर होते ही केवळ 'नैसर्गिक आपत्ती' नाही, ती आर्थिक, सामाजिक स्वरूपाचीच आपत्ती असते. अवर्षण वा तत्सम घडामोड (अतिवृष्टी, गारपीट इ.) हे केवळ तिचे तात्कालिक कारण असते. आज जेव्हा विज्ञान-तंत्रज्ञानाचा तसेच मानवाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे उत्पादन करता येई अशा उत्पादन पद्धतीचा विकास झालेला आहे, आणि त्यामुळे दुष्काळावर मात करता येणे शक्य झाले आहे, अशावेळी दुष्काळ हा प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक व राजकिय कारणांना टिकून राहिला आहे.

दुष्काळ अस्मानी नसून सुलतानी आहे असे जेव्हा म्हटले जाते, दुष्काळ 'निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे' असे म्हटले जाते तेव्हा त्याचा अर्थ हा असतो. पण 'दुष्काळ मानवनिर्मित आहे' एवढेच केवळ म्हणणे पुरेसे नाही. दुष्काळाला कोण माणसे जबाबदार आहेत आणि ती कशी जबाबदार आहेत हे शोधावे लागले, माणसे समाजात ज्या अवस्थेत राहतात तिथे दुष्काळ न हटण्याची कारणे शोधावी लागतील, त्यांचा आणि शासनाचा व शासनाच्या दुष्काळ विषयक धोरणांचा काय संबंध आहे हे पहावे लागेल.

दुष्काळ निर्मूलनासाठी अनेक तज्ञ, संघटना, राजकीय पक्ष यांच्याकडून आज नाना उपाय मांडले जात आहेत. त्यातील बहुतेक उपाय, अगदी जे दुष्काळ मानवनिर्मित आहे असे म्हणणाऱ्यांनी सुचविलेले उपायदेखील, या प्रश्नाकडे खऱ्याखुऱ्या शास्त्रशुद्ध व समग्र दृष्टिने न पाहता सुचवले जात असतात. दुष्काळ हा अत्यंत जुनाट, चिवट आणि ग्रामीण व्यवस्थेत खोलवर पाळेमुळे रूजलेला आजार असल्यामुळे त्याचे

संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी त्याविरूद्ध सगळ्या बाजूंनी लढा द्यावा लागेल. दुष्काळाच्या प्रश्नात अनेक घटक आहेत व ते परस्परांशी अविभाज्यपणे गुंतलेले आहेत. या साऱ्या घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. पाऊस, जमीन, हवामान, भूगर्भशास्त्रीय परिस्थिती, जंगले इ. नैसर्गिक घटक दुष्काळाला कितपत जबाबदार आहेत हा झाला त्याचा एक भाग पाण्याशिवाय शेती होऊ शकत नाही. जेव्हा पाऊस पुरेसा पडत नाही तेव्हा शेतीवर होणारा अनिष्ट परिणाम टाळण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ्याचा सोयींचा म्हणजे सिंचन व्यवस्थेचा विचार करावा लागतो. त्यामध्ये भौगोलिक परिस्थिती, उपलब्ध नदीनाल्यांचे पाणी आणि भूजल जमिनी खालील पाणी, धरण योजना व विहीरी यांचा विकास, वगैरे गोष्टींचा विचार करावा लागतो. या उपलब्ध पाण्याचे वाटप कसे होऊ शकेल, आज पाण्यावर कोणत्या प्रकारची पिके घेतली जातात, येथील हवामान आणि जमिनीची प्रत यांच्याशी उपलब्ध पाण्याचा मेळ घालून अधिकात अधिक उत्पादन कसे मिळविता येईल, इ. सिंचन व कृषी विषयक तंत्रवैज्ञानिक बाबींचा विचारही त्यामध्ये करावा लागेल.

तसेच या शेतीच्या उत्पादनाचे आणि शेतीत घातल्या जाणाऱ्या बियाणे, खते, अवजारे, वीज, किटकनाशके इ. आदानाचे अर्थकरण, सिंचन आणि कृषी विकासासाठी लागणाऱ्या पैशांची तरतूद, याविषयी करावे लागणारे धोरणात्मक बदल, या बदलांची सध्याच्या चौकटीतील मर्यादा, इ. आर्थिक-राजकिय घटकही त्यामध्ये येतात. उदा. आठमाही सिंचन धोरण स्वीकारायचे झाल्यास त्यामध्ये पाण्याच्या वाटपाच्या कसोट्या व पद्धती, त्यानुसार कालवे व चाऱ्यांमध्ये करावे लागणारे विस्तृतीकरण व बदल, यासाठी लागणाऱ्या निधीची तरतुद; स्वीकारावी लागणारी पीकपद्धती; सध्याच्या पिकपद्धतीवर, ग्रामीण जीवनावर व संबंधित उद्योगावर होणारे परिणाम नव्या पिकांचे अर्थकरण इ. अनेक तंत्रवैज्ञानिक व आर्थिक-सामाजिक घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते.

ज्या लोकसंख्येला शेतीवर चांगल्या प्रकारे उपजीविका करणे शक्य नाही अथवा ज्या लोकसंख्येला भार शेती पेलू शकत नाही, तिच्या संदर्भात बिगर शेती व्यवसाय, ग्रामीण व शहरी औद्योगिकरण इ. महत्त्वाच्या आर्थिक बाबींकडेही लक्ष द्यावे लागेल.

त्याचबरोबर पाणी, जमीन,तंत्रज्ञान व श्रम यांचा सुयोग्य मेळ घालण्याचा या प्रयत्नांमध्ये काही मूलभूत संस्थात्मक अथवा संरचनात्मक अडसर आडवे येत असतात. जमीन व शेतीची इतर साधने यांच्या समाजातल्या वेगवेगळ्या वर्गामध्ये झालेल्या विषम वाटपामुळे शास्त्रीय पद्धतीने शेती व दुष्काळ निर्मूलन

करणे अशक्य बनते. या गोष्टींचाही विचार करावा लागेल. थोडक्यात, दुष्काळ निर्मूलनासाठी करावयाच्या उपाय योजनेत नैसर्गिक, तंत्रवैज्ञानिक तसेच आर्थिक, सामाजिक, राजकीय इ. सर्व घटकांचा समावेश होतो त्यामुळे महाराष्ट्रातील दुष्काळ निर्मूलनासाठी या साऱ्या घटकांचा समावेश एकात्मीक पद्धतीने विचार करणारे शास्त्रशुद्ध धोरण निश्चित करणे आणि ते नियोजनबद्ध पद्धतीने प्रत्यक्षात आणणे याची आवश्यकता आहे.'

दुष्काळावार मात करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवल्या पाहिजेत असा विचार सातत्याने मांडण्यात येतो. संसद, विधानसभा इ. महत्त्वपूर्ण व्यासपीठांपासून तर गाव पातळीपर्यंत दुष्काळ निवारण्यावरील चर्चेत मुद्दा आग्रहाने मांडण्यात येतो. दुष्काळी परिस्थितीत जनतेला मदत करण्याची प्रभावी यंत्रणा व धोरणे आखण्यात स्वातंत्र्योत्तर काळात आपण अभिमान वाटावा अशी प्रगती केली आहे. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात मिळून सुमारे एक शतकापेक्षा अधिक काळ या प्रश्नावर आपण अंधारातच चाचपडत आहोत किंवा काय असे वाटू लागते. दुष्काळावर कायमस्वरूपी इलाज शोधण्यात आपणास यश तर आलेच नाही, परंतु दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी होणारा खर्चही दर पंचवार्षिक योजनेत सारखा वाढत चालला आहे. परंतु दुष्काळाची झळ जनतेला विशेष जाणवणार नाही अशी परिस्थिती निर्माण करण्यात आपणास आतापर्यंत यश मिळालेले नाही. हे प्रांजळपणे मान्य केले पाहिजे. देशाची अर्थव्यवस्था कशी असावी, म्हणजे दुष्काळाची झळ जनतेला फारशी लागणार नाही. या संबंधीची वैचारिक स्पष्टता नसल्यामुळे ह्या दुर्दैवी आपण व आपले राष्ट्र सापडले आहे. ही चिंतेचीच बाब आहे. हे असेच चालू राहिले तर विकासाच्या प्रक्रियेवर प्रतिकूल परिणाम होण्यास वेळ लागणार नाही आणि काही कालावधीने तर नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासही पैसा अपूरा पडू लागेल.

दुष्काळामुळे शेती उत्पादन तर कमी होतेच तथापि, ज्या भागात दुष्काळामुळे शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असेल, तेथे लक्षावधी शेतकरी, शेतमजूर यांच्या हालअपेष्टांना पारावार राहत नाही. अनेकांचे जीवन सर्वस्वी उध्वस्त होते. शेती हे एकमेव उपजीवीकेचे साधन असल्यामुळे त्यांच्या जीवनात जगण्याला काहीही आधार राहत नाही. त्यांचा आत्मविश्वास नाहीसा होतो. हे हताश बनतात. अधिक कर्जबाजारी बनतात. आणि पुढील अनेक वर्षांचे त्यांचे कौटुंबिक अंदाजपत्रक संकटात येते. बऱ्यापैकी पर्जन्यवृष्टी झाली की लक्षावधी शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनेल असे सरकार व रिझर्व्ह बँक गृहित धरुन

चालते. ८० टक्के शेतकऱ्यांची शेती ही आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही याचा सर्वांनाच विसर पडतो. आजची ग्रामच्या दुष्काळी भागातील खेड्यांतील जीवन शहरातील झोपडपट्ट्यातील जीवन ह्यात फारसा फरक राहीलेला नाही.

याशिवाय देशातील व्यापार, उद्योग इ. वरही दुष्काळाचा प्रतिकूल परिणाम होत असतो. शेतीमालाची निर्यात कमी होते. खाद्य तेल इ. सारख्या जीवनावश्यक वस्तूंच्या आयातीत प्रचंड वाढ करण्याची पाळी येते. ग्रामीण भागातील जनतेची क्रयशक्ती कमी झाल्यामुळे औद्योगिक मालाचा ग्रामीण भागात होणारा खप कमी होतो. आणि औद्योगिक मंदी डोके वर काढते. मंदीच्या लाटेत अनेक उद्योग सापडतात. दुष्काळामुळे रुपयाची किंमत कमी चलनवाढ होण्याची प्रक्रिया सुरू होते. केंद्र आणि राज्य सरकारच्या तिजोरीवर कमालीचा ताण पडतो. अनेक वेळा केंद्र राज्य सरकारच्या तुटीच्या अंदाजपत्रकात भर पडते. राष्ट्रीय उत्पादनवाढीची गती मंदावते. आणि अशा तऱ्हेने जनतेच्या जीवनावर दूरगामी परिणाम होतो. हे पहाता जनतेला आर्थिक दृष्ट्या शक्तिशाली बनल्याशिवाय आणि एकूण अर्थव्यवस्थाच बलशाली बनल्याशिवाय दुष्काळाला तोंड देण्याचे सामर्थ्य अर्थव्यवस्थेमध्ये कधीच येणार नाही. आज आमचे वार्षिक दरडोई उत्पन्न फक्त सुमारे २५० डॉलर म्हणजे अडीच तीन हजार रूपये आहे. अशी कमकुवत अर्थव्यवस्था नैसर्गिक आपत्तींना तोंड देऊ शकेल?

हल्ली दुष्काळ अथवा पूर या नैसर्गिक आपत्ती आल्या की, ग्रामीण भागातील कोट्यावधी जनतेवर अक्षरश: उपासमारीचा प्रसंग येतो. आणि ते अभूतपूर्व अशा आर्थिक संकटात सापडतात. असे का व्हावे याची कारणे शोधणे अवघड नाही. सध्या भारतात सुमारे ६६ ते ७० टक्के लोक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने शेतीवर अवलंबून आहेत. एकूण शेतीपैकी राष्ट्रीय पातळीवर फक्त तीस टक्के जमीन बागायती आहे आणि सत्तर टक्के जिरायती आहे. जिरायती जमिनीतील एकरी उत्पादनात किती चढउतार व अनिश्चितता असते हे जाणकारांना सांगण्याची आवश्यकता नाही. जिरायती शेती करणारे शेतकरी सतत अनिश्चिततेच्या संकटात असतात. केवळ इंच अथवा सेंटिमीटर मध्ये पुरेसा पाऊस पडून चालत नाही. तर पाऊस, पुरेसा झाला, परंतु पेरणी, रोपट्याची फूट येणे, फुलोरा येणे, कणसात धान्य भरणे अशा पिकांच्या वाढीच्या महत्त्वपूर्ण अवस्थेस पुरेसा पाऊस झाला नाही तर उत्पादन क्षमतेवर मोठाच प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. निव्वळ पावसावरची शेती म्हणजे एकप्रकारचा जुगारच आहे. ती सुस्थिर पायावर उभी करणे

महाप्रयासाचे काम आहे. म्हणून दुष्काळा विरूद्धच्या कार्यक्रमांत सर्वांत अधिक अग्रक्रम अधिकांत अधिक जमीन ओलिताखाली आणणे या कार्यक्रमालाच दिला पाहिले. दुर्दैवाने या कार्यक्रमास प्रत्यक्ष व्यवहारात अग्रक्रम दिलेला नाही तसे असते तर पाटबंधारे आयोगाचे शिफारशीनुसार १९८० साल उजाडले तरी महाराष्ट्रातील फक्त १/३ पाणीच अडवले गेले आहे. आणि अजून २/३ पाणी अडवायचे बाकी आहे. आता तर बहुतेक पाटबंधारे योजनांची कामे जवळ जवळ बंद आहेत किंवा पैशाअभावी भंडावली आहेत. पाटबंधारे योजनांच्या आधारे दुष्काळी भागाला संरक्षण देण्याचा प्रश्न अग्रक्रमाचा तर राहीलाच नाही, परंतु दिवसेंदिवस ही कामे पुरी करणे वाढलेला खर्च लक्षात घेता अवघड होणार आहे.[४]

**पाणी** :-

पाणी म्हणजे जीवदान असे म्हटले जाते. जे सर्व काही चालते ते सर्व पाण्यावर चालत असते. पाण्याशिवाय कोणताही विकास घडू शकत नाही. देशातील पाण्याचा प्रश्न हा राष्ट्राच्या विकासात महत्त्वाचा घटक बनला आहे. सुदैवाने श्री. राजीव गांधी यांनी राष्ट्रीय जलसंपत्ती मंडळाच्या कार्याला खूपच चांगली दिशा व चालना दिली आहे. जलसंपत्ती ही राष्ट्राची संपत्ती आहे. या संपत्तीचा उपयोग आधुनिक पद्धतीचा करावयास पाहिजे. देशातील ज्या भागात जलसंपत्ती अधिक आहे, तेथील जलसंपत्तीचा उपयोग एका खोऱ्यातील पाणी दुसऱ्या खोऱ्यांत नेऊन कमी जलसंपत्ती असलेल्या भागांत व दुष्काळी प्रदेशांत उपयोगांत आणावयास पाहिजे. शक्य झाल्यास पाण्याची राष्ट्रीय साखळी निर्माण करण्याच्या दृष्टीनेही जिव्हाळ्याचे विचार राष्ट्रीय जलसंपत्ती मंडळाने श्री. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रापुढे मांडले आहेत.

हल्ली भारतात एकूण उपयोगात आणलेल्या पाण्यापैकी ८५ ते ९० टक्के पाणी शेतीसाठी उपयोगात आणले जाते हे लक्षात घेता, शेतीच्या पाण्याचा उपयोग जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व कमाल जमीन ओलिताखाली आणण्यासाठी कसा करता येईल आणि पिण्याच्या पाण्याचे औद्योगिक विकासाचे प्रश्नही त्या सोबत कसे सोडविता येतील या दृष्टिने विचार करावयास पाहिजे. हे लक्षात घेऊन बागायती शेतीचे पाणी शास्त्रोक्त पद्धतीने वापरण्याच्या प्रश्नाची येथे तपशिलाने चर्चा केली आहे. पाणी ही मर्यादित नैसर्गिक संपत्ती आहे. आणि गरजेच्या मानाने पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाही. ह्या वास्तवतेची वाढत्या प्रमाणात आता सर्वांनाच जाणीव होऊ लागली आहे. मात्र ऊर्जा संकटाची जशी मानवाला तीव्रतेने

जाणीव झालेली आहे, तशी पाण्याच्या संकटाची जाणीव झालेली नाही. वास्तविक पाहता पाण्याचे संकट हे ऊर्जा संकटाइतकेच किंवा त्याहीपेक्षा अधिक मोठी व्याप्ती असलेले संकट आहे. उपलब्ध असलेल्या जगातील पाण्याची विभागणीही नैसर्गिक रित्याच दुर्दैवाने अत्यंत विषमतेने झालेली आहे. भारतातील दरडोई पाणीही असेच विषमतेने विभागलेले आहे. जगाच्या मानाने भारताला दरडोई जे पाणी उपलब्ध आहे त्यामानाने महाराष्ट्रातील व विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील, पश्चिम मराठवाड्यातील आणि विदर्भातील काही जिल्हे ह्यांतील दुष्काळी भागात दरडोई पाण्याची उपलब्धता तर अगदीच कमी आहे.

भारतात दरडोई उपलब्धता किती कमी आहे यासंबंधी संशोधक एम. आय. इलव्होविच यांनी जगातील उपलब्ध जलसंपत्ती आणि या जलसंपत्तीचे भवितव्य या सुप्रसिद्ध ग्रंथात संकलित केलेली माहिती आपल्या दृष्टिने मोठी उद्‌बोधक आहे. प्रस्तुतच्या ग्रंथाचे रशियन भाषेतून इंग्रजीत भाषांतर एका अमेरिकन लेखकाने केलेले आहे. या ग्रंथातील पाण्यासंबंधीची माहिती जागतिक अन्न शेती संघटनेनेही आपल्या प्रकाशनात संदर्भ म्हणून उपयोगात आणलेली आहे.

काही निवडक देशांतील वाहणाऱ्या पाण्याची १९८३ मधील दरडोई उपलब्धता आणि इ. स. दोन हजारमधील संभाव्य बदल याबाबतीत वर उल्लेख केलेल्या ग्रंथात पुढीलप्रमाणे माहिती दिली आहे.

**तालिका क्रमांक १**

| देशाचे नांव | १९८३ | २००० | बदल |
|---|---|---|---|
| कॅनडा | ११०.० | ९५.१ | -१४ |
| नॉर्वे | ९१.७ | ९१.७ | ० |
| ब्राझील | ४३.२ | ३०.२ | -३० |
| व्हेनेझुएला | ४२.३ | २६.८ | -३८ |
| स्वीडन | २३.४ | २४.३ | -४ |
| ऑस्ट्रेलिया | २१.८ | १८.५ | -१५ |
| सोवियत युनियन | १६.० | १४.१ | -१२ |
| अमेरिका (यु. एस. ए.) | १०.० | ८.८ | -१२ |
| इंडोनेशिया | ९.७ | ७.६ | -२२ |
| मेक्सिको | ४.४ | २.९ | -३४ |
| फ्रान्स | ४.३ | ४.१ | -५ |
| जपान | ३.३ | ३.१ | -६ |
| नायजेरिया | ३.१ | १.८ | -४२ |
| चीन | २.८ | २.३ | -१८ |

| देशाचे नांव | १९८३ | २००० | बदल |
|---|---|---|---|
| भारत | २.१ | १.६ | -२४ |
| केनिय | २.० | १.२ | -५० |
| दक्षिण आफ्रिका व स्वीत्झर्लंड | १.९ | १.२ | -३७ |
| पोलंड | १.५ | १.४ | -७ |
| पश्चिम जर्मनी | १.४ | १.४ | -७ |
| बांगला देश | १.३ | ०.९ | -३१ |
| इजिप्त | ०.९ | ०.६ | -३३ |
| जग | ८.३ | ६.३ | -२४ |

भारतातील दरडोई उपलब्ध असलेल्या पाण्याचे आकडे महाराष्ट्राच्या बाबतीत आणि त्यातल्या त्यात पश्चिम महाराष्ट्र, मराठवाड्याच्या पश्चिम भाग, विदर्भातील बुलढाणा, अकोला इ. भागाच्या दृष्टिने दिशाभूल करणारे ठरणार आहेत. देशांत सर्वात मोठी नदी ब्रह्मपुत्रा आहे. तथापि ब्रह्मपुत्रेचे पाच टक्केसुद्धा पाणी उपयोगात आणणे अवघड आहे. ब्रह्मपुत्रा, गंगा, महानदी इ. ओरिसातील नद्या, गोदावरीला मिळणारे आणि तद्नंतर आंध्रला जाणारे वैनगंगेचे पाणी आणि कोकणात पडणाऱ्या पाण्यापैकी ४१ टक्के पाणी वगळून, महाराष्ट्रातील पाण्याच्या दरडोई उपलब्धतेचा आकडा काढला तर अशा भारतीय आकड्यापेक्षा महाराष्ट्राचा आकडा पंचवीस टक्के असेल. महाराष्ट्रातील अभियंत्यांनी याचा हिशोब करावयास पाहिजे.[१]

परंतु ह्या हिशोबाच्या बारकाव्यात न जातासुद्धा पाणी वापराबाबतचे सर्वात अधिक काटकसरीच्या आणि कार्यक्षम तंत्रविज्ञानाचा महाराष्ट्रातील शेतीसाठी अवलंब केल्याशिवाय महाराष्ट्राला दुसरा पर्याय नाही. शेतीसाठी परंपरागत पद्धतीने, म्हणजे प्रवाहाने अगर पूरपद्धतीने पाणी वापरण्याइतके पाणीच आपणाजवळ उपलब्ध नाही. मुक्त प्रमाणात पाणी वापरण्याचा काळ त्यामुळे इतिहासजमा होणे अपरिहार्य आहे. भावी काळातील पाण्याचे नियोजन करतानाही यापूर्वी दिलेली माहिती व पार्श्वभूती लक्षात घ्यावी लागेल, परंतू त्याचबरोबर महाराष्ट्रातील जून्या पाटबंधारे प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रातील अनुभवाच्या शिदोरीच्या उपयोगही औपचारिक अभ्यास आणि प्रत्यक्ष निर्माण झालेल्या परिस्थितीचे निरीक्षण यांच्या आधारे नियोजनासाठी करून घ्यावा लागेल. अकोला, बुलढाणा, बीडच्या बराचसा भाग, उस्मानाबाद, लातूर हे जिल्हे, पश्चिम महाराष्ट्रातला साताऱ्याच्या पूर्व भागातील मान सारखे पठारी प्रदेश, सोलापूर,

अहमदनगर इ. भागांतील प्रश्न तर अधिक गुंतागुंतीचे आहेत. याही भागातील पाण्याचे प्रश्न सोडवावे लागतील. महाराष्ट्रातील अभियंत्याच्या कल्पकतेला यावर उल्लेख केलेल्या भागातील पाण्याचे प्रश्न एक आव्हानच आहे.

पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे आणि सर्व जनतेचा त्यावर अधिकार आहे. राष्ट्रीय जलसंपत्ती मंडळाच्या सभेत पंतप्रधान राजीव गांधी यांनी सर्व राष्ट्रांचे वतीने या मूलभूत तत्त्वाचा पुनरुच्चार केला आहे. कोणत्याही नदीच्या खोऱ्यातील पाण्यावर सर्व जनतेने आपला हक्क सांगितला तर त्यात गैर काहीच नाही. धरणाचे पाणी फक्त कालव्याच्या कार्यक्षेत्रात वापरायचे असा मर्यादित दृष्टिकोन पूर्वीच्या काळातील शासनाचा होता. तथापि, आता उपसासिंचन सहाय्याने पाणी वापरणे हे सर्वत्र व्यवहारी समजले जाते. त्यामुळे पाण्याची थोडी काटकसरही होते. सातारा, कोल्हापूर, सांगली या जिल्ह्यातील बहुतेक बागायत उपसासिंचन योजनाच्या आधारेच उभी राहिली आहेत. कॅलिफोर्निया या अमेरिकेतल्या प्रांतातील शेती ही अमेरिकेत व जगात पुढारलेली आणि समृद्ध अशी शेती समजली जाते. कॅलिफोर्निया प्रांतातील बहुतेक बागायत दोन हजार फूट उंचावरून उचललेल्या एका मोठ्या उपसासिंचन प्रकल्पाच्या आधारे उभी राहिली आहे. तेव्हा प्रवरा खोऱ्यातील अकोले तालुक्यातील आदिवासी अथवा इतर शेतकरी असोत, त्यांचा प्रवरा नदीचे पाणी उचलण्याचा हक्क नाकारता येणार नाही. त्याचबरोबर प्रवरा कालवेचे श्रीरामपूरच्या पूर्व भागासही पाणी मिळेल असे धोरण ठरवावे लागेल. महाराष्ट्रातील इतर नद्यांच्या खोऱ्यांतही अशाच न्याय धोरणांचा व तत्त्वांचा पाण्याच्या वाटपाबाबत सर्व जनतेला न्याय देण्यासाठी अवलंब करावा लागेल. जनतेच्या आशाआकांक्षा आणि वाजवी गरजा लक्षात घेऊन पाण्यासंबंधीच्या धोरणात आमूलाग्र बदल करावे लागतील.'

महाराष्ट्रातील हवामान, पर्जन्यवृष्टीतील अनियमितपणा वगैरे घटक, लोकसंख्येचा शेतीवरील सातत्याने वाढणारा बोजा, आणि शेतीचे होणारे लहान तुकड्यातील विभाजन यामुळे जिरायती शेतीचे प्रश्न तर अधिकच अवघड होत चालले आहेत.

तेव्हा महाराष्ट्रातील पाण्याचे आणि शेतीचे नियोजन करताना सुमारे ६० ते ७० टक्के जमीन ओलिताखाली कशा तऱ्हेने आणता येईल हे उद्दिष्ट पुढे ठेवूनच नियोजन करावे लागेल. ठिबक पद्धतीचा अवलंब ठेवूनच इझ्राईलने असा काटकसरीने शेतीसाठी पाण्याचा उपयोग केला आहे, त्याचेच अनुकरण

आपणास करावे लागेल. पाण्याला पर्याय नाही आणि बहुतेक जिरायती शेती परवडणारी नाही हेही मुद्दे लक्षात घ्यावे लागतील. पीक पद्धती बदलण्याच्या मार्गात कितीही अडचणी असल्या तरी त्यांतून मार्ग काढावा लागेल. बरीचशी शेती ही वनशेती बनवावी लागेल. अस्तित्वात असलेली साखर कारखानदारी वाचवावी लागेल. नवीन साखर कारखाने काढताना साखर कारखान्यांसाठी पाण्याची खात्रीशीर उपलब्धता यासंबंधी योग्य निष्कर्ष काढून व अभ्यास करून निर्णय घ्यावे लागतील. पाण्याबाबत समाजाला न्याय देण्याबाबत अडचण येणार नाही, हे लक्षात घेऊन आणि पाण्याच्या बहुविध उपयोगामध्ये समतोल सांभाळणे कसे शक्य होईल हे दृष्टिपुढे ठेवून नवीन साखर कारखान्यांचा विचार करणे शहाणपणाचे होणार आहे. कमी पाण्यावर पिके काढणे, फळबागा आणि प्रक्रिया कारखानदारीस पूरक ठरणारी बागायती शेती करणे ह्यास पुष्कळ वाव आहे. अशा अनेक पर्यायांचा कृषि औद्योगिक विकासासाठी उपयोग करावा लागेल. ग्रामीण भाग आज आहे तसा ठेवूनही चालणार नाही. तो कृषि-औद्योगिक बनवावा लागेल.'

जमिनीप्रमाणे पाणी ही मर्यादित नैसर्गिक संपत्ती आहे. कमाल उत्पादमक्षमता, पाण्याच्या वापराची सर्वात मोठी कार्यक्षमता आणि काटकसर ही उद्दिष्टे दृष्टिपुढे ठेवूनच पाण्याचा उपयोग केला पाहिजे. शेतीसाठी पाण्याचा उपयोग हा मानवी जीवनातील विविध उपयोगांपैकी एक उपयोग आहे. शेती, औद्योगिक विकास, नागरी गरजा, पर्यावरण, वनसृष्टी, पशूपक्षी, इ. च्या पाण्याच्या गरजा लक्षात घेऊन आणि त्यात संपूर्णपणे समतोल साधून पाण्याचे नियोजन केले पाहिजे. हा समतोल हाच पाण्याचे नियोजनातील केंद्रबिंदू मानला पाहिजे.'

**<u>प्रस्तुत प्रबंधाचा उद्देश आणि संशोधन पद्धती</u> :-**

शेतीच्या पाण्याचा प्रश्न हा राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टिने महत्त्वाचा बनला आहे. कारण स्वातंत्र्यपूर्व काळापासून आत्तापर्यंतचे दुष्काळ हे भयानक आहेत. व या दुष्काळांचे जर प्रमाण कमी कराचे असेल तर जलसंपत्तीचा उपयोग आधुनिक पद्धतीचा अवलंब करून आणि काटकसरीने व कार्यक्षमतेने केला पाहिजे. भारतात एकूण उपयोगात आणलेल्या पाण्यापैकी ९५ टक्के पाणी शेतीसाठी उपयोगात आणले जाते. शेतीचा विकास व औद्योगिक विकास यासाठी जलसंपत्ती व तिचे नियोजन आवश्यक आहे. पाणी ही शेतीची शक्ती आहे व राष्ट्राची संपत्ती आहे. हे आपल्या कृषी प्रधान देशाने ओळखले व त्यादृष्टिने

पाण्याचे नियंत्रण व नियोजन या गोष्टींचा विचार केला जावू लागला आणि त्या दृष्टिने धरणे, उपसा जलसिंचन योजना यांची सुरुवात झाली त्यातून विकासाची पावले उचलू लागली.

विकासाच्या राजकारणामध्ये निरनिराळे पाटबंधारे प्रकल्प बांधणे, उपसा सिंचन प्रकल्प तयार करणे व त्याद्वारे हरितक्रांती घडवून आणणे हा महत्त्वाचा कार्यक्रम ठरला त्यामुळे वेगवेगळ्या राजकीच पुढाऱ्यांच्या मध्ये आपल्या भागांमध्ये पाणी कशा प्रकारे येईल याचे शोध घेवू लागले व त्यातूनच ताकारी योजनेचा प्रस्ताव पुढे आला. महाराष्ट्रामध्ये ही योजना गाजलेली आहे. कृष्णा नदीही सातारा-सांगली या जिल्ह्यातून वहाते. व या नदीवरच ताकारी गावाजवळ हा प्रकल्प आहे. वसंतराव दादांनी ही योजना मंजूर केली. सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्याच्या दुष्काळी भागासाठी ही योजना आहे. जवळ जवळ २० वर्षे ही योजना लोंबकळत पडलेली आहे. याच्यावरच बऱ्याच राजकिय मंडळींनी आपला डाव मांडला आहे. व या योजनेच्या पाणी प्रश्नावर बऱ्याच राजकी नेते मंडळींनी आपले राजकारण केले आहे. व यांच्या राजकारणामुळे याला वाली कोण आहे की नाही हे समजत नव्हते. व यावर ही योजना रखडत गेली.

प्रस्तुत प्रबंधामध्ये या योजनेसंबंधी तालुक्यातील राजकीय समतोलाच्या संदर्भात योजना कशी रखडली याचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच दुष्काळी भागासाठी पाणी संघर्ष चळवळीने कसा लढा दिला याचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासात कोणत्या राजकीय नेत्यांचे संबंध आले त्याचा अभ्यास करण्यात आला. तसेच या प्रकल्पाला कोणत्या राजकिय नेत्यांचे श्रेय लाभले याचा अभ्यास करण्यात आला.

हा अभ्यास मुख्यत: प्राथमिक आणि दुय्यम दर्जाच्या माहितीच्या आधारे केला आहे. या योजनेच्या तांत्रिक माहिती मिळविण्यासाठी वेळोवेळी योजनांच्या ठिकाणी जाऊन माहिती घेतली तसेच योजनेवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन माहिती मिळविली. त्याप्रमाणे योजनेवर आलेले वेगवेगळ्या वर्तमान पत्रातील लेख, रिपोर्टस्, बातम्या, अग्रलेख, माहिती पत्रके, निवेदने, जाहिरनामे, आवाहने, अहवाल, योजनेच्या ऑफिस मधून मिळालेली माहिती यांची मदत घेतली. त्याचप्रमाणे योजनेच्या चळवळी विषयी उपलब्ध माहिती मिळाली तसेच योजनेत गुंतलेल्या महत्वाच्या पुढाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या, अधिवेशनामध्ये झालेल्या चर्चेची माहिती घेतली. तसेच बऱ्याच शेतकऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. ही योजना नवीन असल्याने यावर जास्त माहिती मिळाली नाही तर ठराविक संदर्भ

पुस्तके व उपलब्ध झालेल्या माहितीचा उपयोग करून या सर्वांचा तुलनात्मक अभ्यास करून साधार सुसंबध असे विवेचन केले आहे. प्रबंधाची मांडणी ऐतिहासिक दृष्टिकोनातून केली आहे.

या विकास प्रक्रियेच्या राजकारणामध्ये योजना कशी राजकीय संबंधामध्ये रखडते. आर्थिक, तांत्रिक अडचणी कशा निर्माण होतात व कुणाचे राजकीय श्रेय ताकत लागून पुर्णत्वाकडे कशी येते यांचा अभ्यास करून मांडणी केली आहे.

## ॐ संदर्भ ☙


१) पळशीकर वसंत : पाणी विशेषांक, परिसरवार्ता, वर्ष तिसरे,अंक ७ वा, मे, १९८८, पान नं. २

२) Desai A. R. : **'Rural Indian In Transition', Popular Prakashan, Bombay, 1961, Page No. 2**

३) दत्ता देसाई : महाराष्ट्रातील दुष्काळ, प्रकाशक/मुद्रक - सुधीर बेडेकर ए., मागोवा प्रकाशन, ७५९/९७ डी, डेक्कन जिमखाना, शांतीभुवन, पुणे ४११ ००४ पान नं. १ ते ६

४) डॉ. आण्णासाहेब शिंदे : महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - परिसंवाद यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे प्रकाशित १९८९, प्लॉट नं. ७ व ९, जन जगन्नाथ भोसले मार्ग, मुंबई ४०० ०२१ पान नं. ५ ते ११

५) सरदेसाई गो. वा. : महाराष्ट्रातील भीषण दुष्काळ : एक दृष्टिक्षेप, मंबई वैभव, वर्ष ३९ (४) जाने. १९७३, पान नं. ६ ते १०

६) डॉ. आण्णासाहेब शिंदे : महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन, परिसंवाद, पान नं. २० ते २२

७) दत्ता देसाई : महाराष्ट्रातील दुष्काळ, पान नं. १०

८) पळशीकर वसंत : महाराष्ट्रातील पाणी पुरवठा, बहि:शाला शिक्षण, ग्रंथमाला - ११ पुणे १९६९, पान नं. १०७